MHGA130002072023

सत्र खटला क्र.८९/२०२३
(जुना क्र. ७५/२०२१)
महा.शासन मार्फत पोलीस स्टेशन,
अहेरी—वि—ललिता सिडाम+४

निशानी ९१ वरील आदेश
(दि.०८/०८/२०२४)

१. अर्जदार/आरोपी क्र.१ ललीत जगन्नाथ सिडाम, रा. नागेपल्ली आणि आरोपी क्र ३ इंद्रजीत सागर खोब्रागडे, रा. गट्टा यांनी कलम ४३९ फौजदारी प्रक्रिया संहिते प्रमाणे अहेरी पोलीस स्टेशन येथील अपराध क्रमांक २४९/२०२१ मध्ये भा.दं.वि. कलम ३०२, १४७, १४८, १४९, १२०(ब) अन्वये नोंद असलेल्या गुन्हयामध्ये नियमीत जामीन मिळणेसाठी अर्ज दिला आहे. अर्जदार हे मौजा नागेपल्ली व मौजा गट्टा येथील रहिवासी आहे. सदर प्रकरणात जवळ पास १२ साक्षदार तपासले आहेत आणि फक्त पोलीस कर्मचा—यांची साक्ष नोंदविणे बाकी आहे. म्हणुन साक्षदारावर दबाव आणण्याची संधी आरोपींजवळ नाही. त्यांची वरील पत्यावरील स्थायी रहिवासी आहेत. त्यांची कुठेही पळून जाण्याची शक्यता नाही. आरोपी क्र. १ चा जामीनीचा हा दुसरा अर्ज आहे आणि आरोपी क्र ३चा जामीनकरीता हा पहिला अर्ज आहे. करीता अर्जदार/आरोपीला न्यायालयाच्या अटी व शर्तीचे पालन करुन जामीन मंजुर करण्यात यावा अशी विनंती करण्यात आली.

२. सरकारी वकील श्री भांडेकर यांनी अर्जास विरोध करतांना नि.क ९१ च्या पाठीमागे आपले म्हणणे दाखल केले की, आरोपीं विरुध्द लावलेला कलम ३०२ भा.दं.वि. चे आरोप हे गंभीरा स्वरुपाचे आहे. अर्जदारं क्र १ ने इतर आरोपींकडून तिचे पतीचा खुन केला. सध्याच्या परिस्थीतीत आरोपीं जामीन मिळण्यास पात्र नाही. करीता विनंती की, उपरोक्त कारणास्तव आरोपी / अर्जदाराचा जामीन अर्ज खारीज करण्यात यावा.

३.  गुन्हयाची हकीकत अशी की, फिर्यादी जगन्नाथ मडावी पोलिस हवालदार यांनी अशी तक्रार नोंदविली की, दि. ०५.०७.२०२१ चे रात्री ००.३० वाजताच्या सुमारास अज्ञात व्यक्तीने कोणत्यातरी कारणावरुन जगन्नाथ सिडाम यास जीवानिशी ठार मारले. तपासादरम्यान असे निष्पन्न झाले की, मृतक जगन्नाथ सिडाम हयाचे त्याची पत्नी ललीता व मुलगी रोहिणी यांचे सोबत पटत नव्हते. त्याकरिता त्या दोघांनी आरोपी क्र. ३ इंद्रजीत खोब्रागडे यास सहा लाख रुपये देण्याचे ठरवून आरोपी क्र. ३ ने आरोपी क्र. ४ व ५ च्या मदतीने चाकू व काठयाने मृतकाचा खून केला. घटनेच्या वेळेस मृतकाच्या मुलगा राहूल हा हॉटेलमध्ये जेवणाकरिता गेला होता. तो घरी परत आल्यावर त्याने पोलिसांना फोन करुन बोलावून घेतले.

४.  अर्जदार/आरोपी क्र. १ व ३ तर्फे वकीलांनी असा युक्तीवाद मांडला की, या गुन्हयात फिर्यादी व इतर महत्वाचे साक्षदार तपासून झालेले आहे. आता फक्त पोलिस साक्षदार तपासणे बाकी आहे. अशा परिस्थीतीत इतर साक्षदारांवर दबाव आणण्याचा प्रश्नच राहत नाही. अर्जदार यांचे विरुध्द कोणताही पुरावा आलेला नाही त्यामूळे अर्जदार यांना गजाआड ठेवण्याचे कोणतेही कारण नाही अशी विनंती करण्यात आली.

५.  याउलट सरकारी वकिल श्री भांडेकर यांनी असा युक्तीवाद मांडला की, यातील आरोपीक क्र १ व २ यांनी आरोपी क्र ३ ला आरोपी क्र ४ व ५ च्या माध्यमाने मारण्याकरीता सहा लाख रुपये दिले आणि त्या आधारे हा गुन्हा झालेला आहे करीता गुन्हा गंभीर स्वरुपाचा आह. या प्रकरणात १२ साक्षदार तपासले आहे बाकी इतर साक्षदार तपासवयाचे आहे त्यामुळे अर्जदाराचा जामीन अर्ज फेटाळण्यात यावा अशी विनंती करण्यात आली.

६.  आरोपी क्र १ व २ यांनी आरोपी क्र ३ ला जगन्नाथ याचा खुन करण्यास सहा लाख रुपये दिले आणि आरोपी क ३ ने आरोपी क्र ४ व ५ यांच्या मार्फत जगन्नाथचा खुन केला असा गंभीर आरोपीवर ठेवण्यात आलेला असून या प्रकरणात एकुण १२ साक्षदार तपासण्यात आलेले आहे. आरोपी क्र १ व तीचे पती यांच्यात कौटुंबिक वाद असल्याने गुन्हा घडल्याचे प्रथमदर्शनी आरोप करण्यात आले व त्यानंतर तपासादरम्यान आरोपी क्र ३ ते ५ यांनी गुन्हा केल्याचा दिसून येते. अशा परिस्थीतीत गुन्हा हा गंभीर

स्वरुपाचा असल्याने तसेच इतर साक्षदार तपासणे बाकी असल्याने आरोपी क्र १ ही वयस्कर स्त्री असल्याने तिला जामीन मंजूर करण्यात येतो परंतू आरोपी क्र ३ याचा गुन्हयाशी प्रत्य क्ष संबध असल्याने त्यास जामीन नाकारण्यात येते. करीता मी खालीलप्रमाणे अंतिम आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज निशानी ९१ अंशत: मंजुर करण्यात येतो.

२. अर्जदार/ आरोपी क्र.१ ललीत जगन्नाथ सिडाम, रा.नागेपल्ली यांना कलम ४३९ फौजदारी प्रक्रिया संहिते प्रमाणे अहेरी पोलीस स्टेशन येथील अपराध क्रमांक २४९/२०२१ मध्ये भा.दं.वि. कलम ३०२, १४७, १४८, १४९, १२०(ब) मध्ये जामीन मंजुर करण्यात येते. परंतु आरोपी क्र ३ इंद्रजीत सागर खोब्रागडे, रा. गटट्ा याचा जामीन अर्ज फेटाळण्यात येतो.

३. अर्जदार/ आरोपी क्र १ ललीता यांनी रक्कम रु.३०,०००/— जात मुचलक्याची (P.R. Bond) व तेवढयाच रकमेचा एक जामीन (Surety) देण्यात यावा.

४. अर्जदार आरोपी क्र १ ने गुन्हयाची पुनरावृत्ती करु नये.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by RAVISHANKAR NAMDEORAO BAWANKAR
Date: 2024.08.08 18:15:23 +0530

अहेरी
दि.०८.०८.२०२४

(र. ना. बावनकर)
अतिरिक्त सत्र न्यायाधीश
अहेरी.